महाराष्ट्र शासन

क्रमांक : मकृप १०१८/प्र.क्र.१६४/६अे
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विभाग
व मस्त्यव्यवसाय विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार,मुंबई ४०० ०३२
दिनांक :२८ऑगस्ट ,२०१८

# जाहिरात

## महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद अंतर्गत
## महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ,अध्यक्ष पदासाठी जाहिरात.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ चे कलम ५८ अन्वये महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषंद,पुणे अंतर्गत महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळची तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळा मार्फत राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील प्राध्यापक व त्यावरील उच्च संवर्गातील रिक्त पदांची सरळसेवा व पदोन्नती अंतर्गत पदभरती तसेच करियर ऑडव्हान्समेंट योजना (टप्पा क्र ४ ते टप्पा क्र ५ व टप्पा क्र ५ ते टप्पा क्र ६) बाबतची कामे केली जातात. सध्या अध्यक्ष, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे सेवा प्रवेश मंडळ हे पद रिक्त असल्याने पात्र उमेदवारांकडून दि. १७/९/२०१८ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. अध्यक्ष पदासाठी पात्र उमेदवारांची आवश्यक अर्हता - उमेदवार राज्यातील कृषि विद्यापीठातील पूर्ण सेवाकाल पूर्ण करणारे माजी कुलगुरु किंवा परराज्यातील कृषि विद्यापीठातील पूर्ण सेवाकाल पूर्ण केलेले माजी कुलगुरु किंवा महासंचालक, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली या दर्जाच्या पदावर कार्य केलेला अधिकारी असावा मात्र ७० वर्षापेक्षा जास्त नसलेल्या उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.
२. अर्ज करावयाचा अंतिम दि.१७/९/२०१८ सायंकाळी १७.०० वाजेपर्यत.
३. अर्ज सादर करण्याचा पत्ता-सदस्य सचिव ,महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब,भांबुर्डा, भोसलेनगर,पुणे- ४११ ००७
४. अर्ज करावयाची पध्दत - उमेदवाराने अर्ज नोंदणीकृत डाक,स्पीड पोस्ट अथवा हातबटवडयाव्दारे वरील नमूद कार्यालयात नोंदणीशाखे मध्ये विहित मुदतीत जमा करु शकतात. विहित मुदतीत प्राप्त अर्जच स्वीकारण्यात येतील. अर्ज सादर करताना अर्जदाराने स्वत:चा संपूर्ण तपशीलवार परिचय पत्र (Biodata), अनुभव, उल्लेखनीय कामाचा तपशील, निवड व नेमणूक झाल्यास Conflict of Interest निर्माण होईल किंवा कसे, आणि निवड झाल्यास उद्दीष्टे काय असतील या बाबतची माहिती सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांचेकडे सादर करावी.

५. अर्ज सादर करताना अर्जदाराने स्वत:चा संपूर्ण तपशील (Biodata) , ज्या संस्थेत वरील नमूद आवश्यक अर्हता प्राप्त केली असेल त्याचा तपशील देण आवश्यक आहे. त्यांनी त्यांचे कार्यालयात लागू असलेली प्रशासकीय अथवा वित्तीय अनियमितता संबंधित कुलपती यांचे स्तरावरुन त्यांना त्यांची चौकशी झाली असल्यास त्यांचा तपशील देणे अपेक्षित आहे. तसेच ते राज्यातील विद्यापीठाशी संलग्न खाजगी शिक्षण संस्थेचे व्यवस्थापनाशी संलग्न, कृषि क्षेत्रात निविष्ठा व कृषि यंत्र निर्माता/पुरवठा करणारी संस्थेशी व्यावसायिक संबंध अथवा इतर कोणतेही प्रकारचे Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

६. निवड झाल्यानंतर अर्जदारास नियुक्ती पूर्व केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचना प्रमाणे (CVC guide line) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदे शी integrity pact करावा लागणार आहे.

७. सदरची नेमणूक ३ वर्ष किंवा राज्यशासनाने केलेले पारित आदेश या दोन्ही पैकी जे कमी असेल तोपर्यंतची राहील.

८. अर्जासोबत अपेक्षित मानधन इत्यादीचा तपशील सादर करावा.

(सही)

अपर मुख्य सचिव (कृषि)
महाराष्ट्र शासन